

मुंबई : मराठी भाषा पंधरवड्याचे उद्घाटन करताना अधिकारी.

# मेट्रोमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

मुंबई : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे मराठी भाषेचे वैभव जपण्याच्या हेतूने १४ ते २८ जानेवारीदरम्यान साजरा करण्यात येणाऱ्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यादरम्यान निबंध स्पर्धा, काव्य लेखन स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, तसेच अभिवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी (ता. १४) मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल यांच्या हस्ते मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मराठीचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.